# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४
# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५
## प्रसिध्दी निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत **दि. १०/०५/२०२५ ऐवजी दि. १४/०५/२०२५** करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन आवेदनशुल्क भरण्याची मुदत **दि. १४/०५/२०२५ रोजी २३.५९** मि. पर्यंत आहे.

तथापि शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५ पुढे ढकलण्याबाबत व इतर अडचणीबाबत युट्युब चॅनेल्स, सोशल मिडीया प्लॅटफॉर्मद्वारे व अन्य माध्यमाद्वारे अनाधिकृत बाबी प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे परीक्षार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊन परीक्षा परिषदेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

तरी या कार्यालयाचे दिनांक **२१/०३/२०२५** च्या प्रसिद्धी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन माहे मे व जून २०२५ मध्ये करत असलेबाबत अवगत करण्यात आले होते. त्यानुसार पात्र उमेदवारांनी सदर परीक्षेबाबत आवश्यक ती पूर्वतयारी करावी असे आवाहन करण्यात आले होते. सदर परीक्षा नियोजित केल्याप्रमाणे घेण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी युट्युब चॅनेल्स व सोशल मिडीया प्लॅटफॉर्मद्वारे दिल्या जाणाऱ्या बातम्या/अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरील वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत वेबसाईट व्यतीरिक्त अन्य माध्यमातून प्रसिद्ध होणाऱ्या चुकीच्या माहितीमुळे विद्यार्थ्यांचे/उमेदवारांचे नुकसान झाल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद हे कार्यालय जबाबदार असणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी/उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावरील माहितीनुसार कार्यवाही करावी.

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: १३/०५/२०२५**

**(अनुराधा ओक)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४

Scanned with OKEN Scanner